ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE * LATUR *

# जिल्हादंडाधिकारी लातूर यांचे कार्यालय

(उपचिटणीस शाखा)

क्रमांक-2023/एमएजी/कक्ष-1/कावि-1481

दिनांक-०३/१०/२०२३

## अधिसूचना

फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 प्रमाणे

ज्याअर्थी, दिनांक ०७ ऑक्टोंबर २०२३ ते ११ ऑक्टोंबर २०२३ पर्यत जि.प.अंतर्गत गट – क (वाहन चालक वगळून) सरळ सेवा भरती प्रक्रिया २०२३ परीक्षा आयोजीत केलेली आहे. त्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या परीक्षा केंद्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.

परीक्षा केंद्र क्र. १ नेटीझन्स डीजिटल, लातुर २. कॉस इन्सीटयुट ऑफ कमप्युटर एजुकेशन,लातुर ३.गुरू ऑनलाईन एक्झाम सेंटर,लातुर ४. स्वामी विवेकानंद इन्सीटयुट ऑफ पॉलटेकनिक, लातुर ५.संदिपानी टेक्नीकल कॅम्पस, कोळपा,लातुर ६.महाराष्ट्र कॉलेज ऑफ पॉलटेक्नीक, निलंगा या उपकेंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने उक्त परीक्षा केंद्राच्या परिसरात मोठया प्रमाणावर परीक्षार्थी येणार आहेत. त्यामुळे परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी, मी नितीन वाघमारे, प्र.अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर फौजदारी प्रक्रियासंहिता 1973 चे कलम 144 अन्वये मला मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त परीक्षा केंद्राच्या 100 मीटरच्या परिसरात खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी करीत आहे.

1. परीक्षा केंद्राचे परिसरात प्रवेश करतेवेळी पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत.
2. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत.
3. परीक्षा केंद्राचे परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्ती कडुन शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यात येणार नाही.
4. 100 मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स,पानटपरी,टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील.
5. परीक्षा केंद्राचे परिसरात मोबाईल फोन,सेल्युलर फोन,ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल.
6. कोणत्याही व्यक्तीकडुन परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही.

७. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस/वाहनास प्रवेश मनाई राहील.

हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी/कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचे बाबत त्यांचे परीक्षासंबधी कर्तव्ये पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत.

Scanned with CamScanner

# जिल्हादंडाधिकारी लातूर यांचे कार्यालय

## (उपचिटणीस शाखा)



हे आदेश आज दि. २८/०९/२०२३ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात आला असून सदर आदेश दिनांक- ०७/१०/२०२३ ते दि.११/१०/२०२३ रोजी सकाळी ०७.३० ते दुपारी ०७.३० वाजेपर्यंत लागु राहतील.

मा.जिल्हादंडाधिकारी यांचे मान्यतेने/-

स्वाक्षरित/-
(नितीन वाघमारे)
प्र.अपर जिल्हादंडाधिकारी लातूर

प्रतिलिपी-- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

1.पोलीस अधिक्षक,लातूर

२.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.लातुर यांना माहितीस्तव.

३.परिक्षा उपकेंद्रक्र. १. नेटीझन्स डीजिटल, लातुर २. कॉस इन्सीटयुट ऑफ कम्प्युटर एजुकेशन,लातुर ३.गुरु ऑनलाईन एक्झाम सेंटर,लातुर ४.स्वामी विवेकानंद इन्सीटयुट ऑफ पॉलटेकनिक, लातुर ५.संदिपानी टेक्नीकल कॅम्पस, कोळपा,लातुर ६.महाराष्ट्र कॉलेज ऑफ पॉलटेक्नीक, निलंगा यांना माहितीस्तव.

२.पोलीस निरीक्षक,पो.स्टे.शिवाजीनगर,लातुर/गांधी चौक/विवेकानंद चौक/एमआयडीसी,लातुर/ निलंगा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

४.जिल्हा माहिती अधिकारी, लातूर यांना देवुन कळविण्यात येते की, सदर अधिसुचनेची प्रसिध्दी विस्तृत प्रमाणावर करावी

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE
LATUR
सत्यमेव जयते

(नितीन वाघमारे)
प्र.अपर जिल्हादंडाधिकारी लातूर
03.10.202

Scanned with CamScanner